# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी – 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स – 22692102.
E-mail : desk10@dtemaharashtra.gov.in Internet : www.dtemaharashtra.gov.in


परिपत्रक

क्रमांक : 10/एनजीपी/मान्यता/2017/ 3628
दिनांक : 30 JUN 2017

विषय : शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था/ अभ्यासक्रम बंद करणे, अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता कमी करणे यांस संचालनालयाची मान्यता देणेबाबत.

असे निदर्शनास आलेले आहे की, शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून किंवा त्यापुर्वी ज्या पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था/ अभ्यासक्रमांना बंद करण्यास, अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता कमी करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे, अशा पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थाकडून सदर पदविका अभ्यासक्रमाची संस्था/ पदविका अभ्यासक्रम बंद करण्याबाबत, पदविका अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता कमी करण्यात आल्याबाबत संचालनालयाच्या मान्यतेची मागणी करण्यात येत आहे.

तरी, उपरोक्त विषयाबाबत संबंधीत पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थांना कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंतशिक्षण परिषदेच्या अखत्यारीतील पदविका अभ्यासक्रमाची संस्था/ पदविका अभ्यासक्रम बंद करणे, पदविका अभ्यासक्रमांची प्रवेशक्षमता कमी करणे इ. प्रकरणी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांची मान्यता व शासन निर्णयान्वये देण्यात आलेली शासन मान्यता अंतिम असून याबाबत संचालनालय स्तरावरुन वेगळे आदेश निर्गमित करण्यात येत नाहीत, याची सर्व संबंधीत पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांनी नोंद घ्यावी.

(चंद्रशेखर ओक) भा.प्र.से.
संचालक,
तंत्र शिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई.

पृष्ठांकन क्र.विकाऔ/शिक्षण/२०१७/2922
दिनांक :- 5 JUL 2017

या कार्यालयाच्या अधिनस्त येत असलेल्या सर्व पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था प्रमुख यांना सुचित करण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था/अभ्यासक्रम बंद करणे, अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता कमी करणे यास अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद,नवी दिल्ली यांची मान्यता व शासन निर्णयान्वये देण्यात आलेली शासन मान्यता अंतिम असून या बाबत संचालनायाच्या स्तरावरून वेगळे आदेश निर्गमित करण्यात येत नसल्याबाबत वरील पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

सोबत :- १. वरील प्रमाणे

**(महेश शिवणक)**
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत :- या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.